# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** लोणी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0353 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/06/2024 01:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 18/06/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/06/2024
**Time From (वेळेपासून):** 12:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/06/2024 **Time (वेळ):** 01:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/06/2024 01:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 6 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय, बाभळेश्वर ,राहाता

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलेश सुरेश मुळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पिंपळगाव उज्जैनी ,अहमदनगर ,लोणी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पिंपळगाव उज्जैनी ,अहमदनगर ,लोणी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शरद भाउसाहेब चेचरे | | | 1. लोहगाव ,राहाता ,लोणी, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनाच्या शंभर रुपयच्या पाच नोटा | 500.00 |

**10. Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फाईल अपलोड केली आहे. फिर्याद

लोणी,ता.राहाता

जि.अहमदनगर

दि.19/06/2024

मी निलेश सुरेश मुळे, वय.32 वर्षे, धंदा.नोकरी, (टाटा मोटार्स फायनान्स, अहमदनगर) रा. पिंपळगाव उज्जैनी, ता.जि.अहमदनगर मो.नं.9028397100 8

मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन टाटा मोटार्स फायनान्स, अहमदनगर येथे खाजगी नोकरी करत आहे. माझे वडील नामे सुरेश नाथाजी मुळे यांचे नावे मौजे बाभळेश्वर खुर्द, ता.राहाता. जि.अहमदनगर येथे गट क्र.75/18 मधील क्षेत्र 2 गुंठे व गट नं.75/22 मधील क्षेत्र 1 गुंठे असे क्षेत्र असुन सदर प्लॉटचे दिनांक 13/06/2024 रोजी माझे व माझ्या वडीलांच्या नावाने रक्कम 15,00,000/- रूपयाचे ए.यु स्मॉल फायनान्स बँक लि.शाखा अहमदनगर यांचे नावे दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडील दस्त क्रं.3684/2024 अन्वये गहाणखत केलेले आहे. सदर गहाण खताची नोंद माझे वडिलांच्या नावे क्षेत्र असलेल्या 7/12 उता-यावर घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांबाबत विचारणा करण्याकरीता दिनांक 14/06/2024 रोजी बाभळेश्वर तलाठी कार्यालयातील काम करणारे तलाठी यांचे खाजगी मदतनीस व माझे परिचयाचे श्री चेचरे यांचा मो.नं.9890769722 वर कॉल केला असता त्यांनी गहाणखताची नोंद घेण्यासाठी तलाठी भाउसाहेबांना फि दयावी लागेल, तुम्ही मंगळवार, दिनांक 18/06/2024 रोजी तलाठी कार्यालय,बाभळेश्वर येथे या,असे सांगितले. गहाणखताची नोंद घेण्याकरीता तलाठी कार्यालयात कोणतीही फी लागत नाही हे मला माहित आहे. त्यावेळी माझ्या लक्षात आले की माझे वडीलांच्या नावे क्षेत्र असलेल्या 7/12 उता-यावर गहाणखताची नोंद घेण्याकरीता तलाठी कार्यालयातील तलाठी यांचे खाजगी मदतनीस चेचरे हे तलाठी मंडलिक यांचेकरीता लाच मागत आहे.मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक 18/06/2024 रोजी सकाळी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय अहमदनगर येथील पोनि श्री.आल्हाट यांना फोन करून तक्रार दिली व मी तलाठी कार्यालय, बाभळेश्वर येथे जावुन तलाठी मंडलिक व त्यांचे खाजगी मदतनीस चेचरे यांची आज दिनांक 18/06/2024 रोजी भेट घेणार असल्याचे सांगितले. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला बाभळेश्वर येथे सुरक्षित ठिकाणी उपस्थित राहण्यास सांगितले. त्यानुसार दि.18/06/2024 रोजी 11/30 वाजेचे सुमारास पोनि आल्हाट व सापळा पथक असे शासकीय वाहनाने बाभळेश्वर येथे मी थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी आले. सदर ठिकाणी पोनि आल्हाट यांनी माझा परिचय करुन घेतला तसेच मला त्यांचा, पंचाचा व सापळा पथकातील कर्मचारी यांचा परिचय करुन दिला.

त्यानंतर मी वरील आशयाची माझी तक्रार पोलीस निरीक्षक आल्हाट यांना दोन पंचासमक्ष तोंडी सांगीतली त्यावेळी पोलीस निरीक्षक आल्हाट यांनी सदरची तक्रार लेखी लिहुन देण्यास सांगीतली असता मी सदर तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. ती तक्रार पो.नि. आल्हाट व दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली, त्यावर मी, दोन पंचांनी व पो.नि.आल्हाट यांनी सही केली. त्यांनतर माझ्या तक्रारीवरुन तलाठी मंडलिक व त्यांचे खाजगी मदतनीस चेचरे हे माझे वडीलांच्या नावे क्षेत्र असलेल्या 7/12 उता-यावर गहाणखताची नोंद घेण्यासाठी लाच मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. पोनि आल्हाट यांनी सदर पडताळणी कारवाईमध्ये व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला व पंचांना माहिती दिली, तसेच आम्हाला पडताळणी कारवाई बाबत सुचना दिल्या. त्यानंतर पोकॉ कराड यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे, दोन्ही पंचांचे तसेच पो.नि.आल्हाट यांचे उपस्थिती बाबत निवेदन रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिले व तलाठी मंडलिक व त्यांचे खाजगी मदतनीस चेचरे यांची भेट घेण्यासाठी मला व पंच क्र.1 यांना माझ्या कडील मोटार सायकलने रवाना केले.
त्यानुसार मी व पंच नं. 1 असें तलाठी कार्यालय, बाभळेश्वर, ता.राहाता, जि.अ.नगर येथे गेलो असता तेथे प्रथम

खाजगी मदतनीस शरद चेचरे यांचेशी माझी भेट झाली व आमच्यात कामासंदर्भात चर्चा झाली त्यावेळी मी त्यांना गहाणखताची नोंद होणेकरीता लिहिलेला छापिल अर्ज तसेच माझेकडील गहाणखताच्या दस्ताची छायांकित प्रत व दस्ताची सुची क्रमांक 2 ची मुळ प्रत इत्यादी दिले व त्यांनतर तलाठी कार्यालयातील तलाठी मंडलिक यांचे सोबत माझे वडीलांच्या नावे क्षेत्र असलेल्या 7/12 उताऱ्यावर गहाणखताची नोंद करणेबाबत चर्चा केली. त्यावेळी मी त्यांना माझेकडील दस्ताची सुची क्र.2 ची छायांकित प्रत व गहाणखताचे दस्ताची मुळ प्रती दिल्या त्यावेळी त्यांनी ते तपासुन माझ्याकडील दस्ताच्या मुळप्रतींपैकी सुची क्रं.2 च्या छायांकित प्रतीवर रिसिव्ह लिहुन सही केली व शिक्का मारण्याकरीता कार्यालयातील त्यांचे खाजगी मदतनीस चेचरे यांचेकडे सदरचे दस्त दिले त्यादरम्यान तलाठी मंडलिक यांनी माझ्याकडे दस्त नोंदणीकरीता कसल्याही प्रकारे लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर तलाठी मंडलिक यांनी शिक्का मारण्याकरीता खाजगी मदतनीस चेचरे यांचेकडे दिलेल्या दस्तावर चेचरे यांनी कामगार तलाठी, मौजे बाभळेश्वर, ता.राहाता. जि.अहमदनगर चा शिक्का मारला व सदरचे सुची क्र.2ची छायांकित प्रत व दस्ताच्या मुळ प्रती मला दिल्या. त्यावेळी मी खाजगी मदतनीस चेचरे यांना माझ्या वडीलांच्या नावे असलेल्या क्षेत्रावर असलेल्या कराबाबत चर्चा करत असताना त्यांनी माझ्याकडील गहाणखत दस्ताची नोंदणी घेण्याकरीता ''आम्ही एक लाखामागे 100 रूपये घेतो'असे म्हणुन ''तुला काय दयायचे ते दे'असे म्हणाले असता मी त्यांना मंडलिक साहेबांना विचारून घ्या, कहितरी कमी करा असे म्हणालो असता त्यांनी तलाठी मंडलिक यांना न विचारता मी आहे असा स्वतः हाताने इशारा करत पाचशे रुपये आणुन दे असे म्हणाल्याने खाजगी मदतनिस चेचरे यांनी तलाठी मंडलिक व स्वतःकरीता गहाणखताची नोंद 7/12 उताऱ्यावर करण्याकरीता माझ्याकडे 500/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना कॅश 500/-रूपये घेवुन येतो असे म्हणाले असता खा.मदतनिस चेचरे यांनी ठिक आहे असे म्हणुन संमती दर्शवली त्यांनतर मी व पंच क्र.1 असे माझ्याकडील मोटार सायकलने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो.

सदर बाबत मी व पंच क्र.1 अषांनी पो नि आल्हाट यांना माहिती दिली, तसेच पो.नि. आल्हाट यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले. त्यावरुन तलाठी कार्यालयातील खाजगी मदतनीस चेचरे यांनी तलाठी मंडलिक यांचे करीता तसेच स्वतःकरीता माझे वडीलांच्या नावे क्षेत्र असलेल्या 7/12 उता-यावर गहाणखताची नोंद घेवुन फेरफार नोंदविण्याकरीता 500 /- रुपये लाच मागणी केल्याचे व ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तलाठी कार्यालय,बाभळेश्वर येथील तलाठी मंडलिक यांचे खाजगी मदतनीस शरद चेचरे यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. त्यानंतर पो.नि. आल्हाट यांनी सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा वापरण्यात येणार असुन त्याबाबत आम्हाला माहिती देवुन त्याबाबतचे पोना लाड यांनी उजेडात व अंधारात प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पो.नि. आल्हाट यांचे सुचनेवरुन मी लाच रक्कम 500/- रुपये त्यात 100/- रुपये दराच्या 5 चलनी नोटा मी माझ्या बचतीतुन हजर केल्या त्यानंतर सदर नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर नोटांवर अँन्थ्रासीन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या पॅटच्या पुढील उजव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर मला व पंचांना सापळा कारवाई बाबत पो.नि. आल्हाट यांनी सुचना दिल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला व मला व पंच क्र. 1 यांना तलाठी कार्यालय, बाभळेश्वर, येथे तलाठी मंडलिक यांचे खाजगी मदतनीस शरद चेचरे यांची भेट घेवुन त्यांनी मागणी केलेली 500/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी माझ्याकडील मोटार सायकलने रवाना केले. आमचे मागोमाग सापळा पथक आले. तलाठी कार्यालय, बाभळेश्वर येथे गेल्यानंतर खाजगी मदतनीस चेचरे हे मला तलाठी कार्यालयात भेटले त्यावेळी मी खाजगी मदतनीस चेचरे यांना हे घ्या बोजा चढवायचे असे बोलुन माझे पॅन्टच्या उजव्या खिशात असलेली 500/- रूपये लाचेची रक्कम समोर धरली असता खाजगी मदतनिस चेचरे यांनी सदरची रक्कम डाव्या हाताने स्विकारून ती त्यांच्या समोरील टेबलाच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवुन दिली. त्यांनतर मी त्यांना सदरच्या 500 रूपयांची पावती भेटेल का असे विचारले असता त्यांनी नाही असे सांगितले. त्यावेळी मी तलाठी कार्यालयातुन बाहेर येवुन सापळा पथकास लाच स्विकारलेबाबतचा नियोजित इशारा केला त्यावेळी तलाठी कार्यालयाच्या जवळच उभे राहिलेले पो.नि.आल्हाट व पंच क्र.2 व सापळा पथकातील कर्मचारी तेथे येवुन त्यांनी खाजगी मदतनीस चेचरे यास लाच रकमेसह रंगेहाथ पकडले व त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर सापळा पथकातील पो.कॉ.कराड यांनी माझेकडुन व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्यावेळी पोनि आल्हाट व त्यांचेसोबतच्या पथकाने खाजगी मदतनीस चेचरे यांना त्यांचे पुर्ण नाव, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव शरद भाउसाहेब चेचरे, धंदा. मदतनीस तलाठी, बाभळेश्वर, रा.लोहगाव, ता.राहाता., जि.अहमदनगर असे सांगितले. त्यानंतर खाजगी इसम शरद भाउसाहेब चेचरे यांचे ताब्यातुन पंच क्र.2 यांचेकरवी हस्तगत करण्यात आलेली लाच रक्कम सापळा कारवाई पुर्वी लिहुन घेण्यात आलेल्या नोटांच्या नंबरषी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळल्याची

खात्री झाली. त्यानंतर तलाठी कार्यालय, बाभळेश्वर, येथील कार्यालयात सापळा कारवाई बाबत खाजगी इसम शरद भाउसाहेब चेचरे यांच्या हाताच्या व मिळुन आलेल्या लाचेच्या नोटाच्या तपासण्या करण्यात आल्या, त्याबाबतचे फोटो काढण्यात आले. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी तलाठी कार्यालयात हजर असलेले तलाठी मंडलिक यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव राहुल रामदास मंडलिक रा..सदनिका क्रं.201, गुरूविश्व बिल्डिंग, राहाता, ता.राहाता, जि.अहमदनगर असे असल्याचे सांगितले. त्यांनतर मी तलाठी कार्यालयात सात बारा उताऱ्यावर नोंद घेण्याकरीता दिलेल्या गहाणखत दस्त तसेच मी दिलेला अर्ज इत्यादींच्या प्रमाणित केलेल्या छांयांकित प्रती तलाठी मंडलिक यांचेकडुन पोनि आल्हाट यांनी प्राप्त केल्या व त्यांनतर पोनि आल्हाट हे खाजगी इसम शरद भाउसाहेब चेचरे यांना सोबत घेवुन पुढील कामकाज करणेकामी शासकिय विश्रामगृह, लोणी सिंचन क्रं.1, लोणी येथे आलो. त्यांचे सुचनेप्रमाणे मी देखील तेथे हजर झालो. पोनि आल्हाट व सापळा पथक यांनी त्यांचे त्या ठिकाणी पुढील कामकाज केले.

तरी दिनांक 18/06/2024 रोजी 12/10 वा ते 12/36 वा. दरम्यान लाच मागणी पडताळणीच्या वेळी व 13/34 ते 13/46 वा. दरम्यान यशस्वी सापळा कारवाईच्या वेळी तलाठी कार्यालय,बाभळेश्वर येथील तलाठी मंडलिक यांचे खाजगी मदतनीस शरद भाउसाहेब चेचरे, यांनी माझ्याकडे माझे वडीलांच्या नावे क्षेत्र असलेल्या 7/12 उताऱ्यावर गहाणखताची नोंद होण्याकरीता व फेरफार नोंदविण्याकरीता तलाठी मंडलिक यांचेकरीता व स्वतःकरीता पंचासमक्ष 500/-रुपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम खाजगी मदतनीस शरद चेचरे यांनी पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी शरद भाउसाहेब चेचरे, खाजगी मदतनीस, तलाठी बाभळेश्वर, रा.लोहगाव, ता. राहाता, जि.अहमदनगर यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद लॅपटॉपवर टंकलिखीत केलेली असुन त्याची प्रिन्ट काढलेनंतर मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष ( निलेश सुरेश मुळे
)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

kailas fakirba wagh(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** kailas fakirba wagh
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**